# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.10.2025** **वार:शनिवार**

1. देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
2. नैसर्गिक शेती, ही काळाची गरज असल्याचं राज्यपाल आचार्य देवव्रत यांचं मत.
3. सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर गावाचं नाव ईश्वरपूर करण्यासाठी केंद्र सरकारची मंजुरी आणि
4. भारतीय जाहिरात क्षेत्राचे शिल्पकार पियुष पांडे यांचं मुंबईत निधन

**<u>रोजगार मेळावा</u>**

केंद्र सरकार तर्फे देशभरात 40 ठिकाणी काल 17 व्या रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात देशभरातील 51 हजार नवनियुक्त उमेदवारांना नियुक्ती पत्रं देण्यात आली. या रोजगार मेळाव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित केलं. देशाच्या युवावर्गाची स्वप्नं रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असं पंतप्रधान म्हणाले. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत 11 लाख नियुक्त्या करण्यात आल्याचं सांगून मोदी म्हणाले.....

**आज आपको केवल सरकारी नियुक्ति नहीं मिली है। आपको राष्ट्र सेवा में सक्रिय योगदान देने का अवसर मिला है। मुझे विश्वास है आप इसी भावना से काम करेंगे। ईमानदारी और शुचिता के साथ आप भविष्य के भारत के लिए बेहतर व्यवस्थाएं बनाने में अपनी भूमिका निभाएंगे।**

नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते टपाल विभागात नियुक्त झालेल्या 25 उमेदवारांना प्रातिनिधीक स्वरूपात नियुक्तीपत्रं वितरित करण्यात आली. या कार्यक्रमात एकंदर 113 जणांना नियुक्तीपत्र देण्यात आली.

पुण्यात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते 102 उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आली. अनेक क्षेत्रात तरुणांना रोजगार मिळत असून, सर्वसमावेशक विकासाच्या उद्देशानं केंद्र सरकार कार्यरत असल्याचं सांगून मोहोळ म्हणाले....

अशा उपक्रमाच्या माध्यमातून एक मोठी संधी आपल्याला प्रदान करते आणि म्हणून माननीय मोदीजी नेहमीच त्यांच्या भाषणामध्ये म्हणतात की कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशाच्या युवकांच्या कठोर परिश्रम, क्षमता आणि नेतृत्वावरती अवलंबून असतो आणि म्हणूनच युवकांना केंद्रस्थानी ठेवून केंद्र सरकारनं, अनेक योजना आणल्या तर रोजगाराच्या इतक्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झाल्या आपण मागच्या दहा वर्षाच्या काळातला आकडा पाहिला तर जवळपास सतरा कोटी एकोणीस लाख नोकऱ्या या मागच्या दहा वर्षाच्या काळात निर्माण झाल्या आणि इतका मोठ्या प्रमाणात रोजगार हा केंद्र सरकारच्या माध्यमातून आपल्याला मिळाला.

मुंबईत झालेल्या कार्यक्रमात राज्याचे मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा आणि महाराष्ट्र गोवा सर्कलचे पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते 80 उमेदवारांना नियुक्तीपत्रं दिली गेली.

**नैसर्गिक शेती**

रासायनिक शेतीमुळे जमीन, पाणी आणि हवा प्रदूषित होत आहे. अन्नधान्य विषयुक्त होत आहे. भावी पिढी आरोग्यदायी व्हावी याकरिता नैसर्गिक शेती करणे अनिवार्य आहे, असं मत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी व्यक्त केलं. मुंबईत राज्य मंत्रिपरिषदेचे सदस्य आणि विधानमंडळाच्या सदस्यांसाठी 'नैसर्गिक शेती' विषयावरील चर्चासत्राचं आयोजन काल करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते. जगभरातील तीव्र वातावरण बदलावर नैसर्गिक शेती हा शाश्वत उपाय असून शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती वरदान ठरेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. राज्याला नैसर्गिक शेतीचं केंद्र बनवलं जाईल असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नैसर्गिक शेतीमुळे अन्न विषमुक्त आणि अमृतयुक्त होईल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, मंत्री, राज्यमंत्री, राज्य विधान मंडळाचे सदस्य, वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**मोदी पुस्तक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ भारताचे नेते नाहीत, तर ते एक विचार आहेत, एक प्रेरणास्रोत आहेत. त्यांचं जीवन हे मानवतेच्या सेवेचं आणि राष्ट्रहितासाठीच्या अखंड समर्पणाचं उत्तम उदाहरण आहे, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल मुंबईत केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवन प्रवासावर आधारित, प्रख्यात वकील बर्जिस देसाई लिखित 'मोदीज मिशन' या पुस्तकाचं प्रकाशन काल राज्यपालांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या विकासाची जी पायाभरणी केली आहे, ती अवर्णनीय आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी केलं. संन्यस्त राहून त्यांनी देशाची सेवा केली, त्यांचं कार्य ऊर्जादायी असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**रक्तदान-डेस्क**

दिवाळीच्या सुटीच्या काळात रक्तदान शिबिरांची संख्या घटली आहे, त्यामुळे गरजू रुग्णांची रक्ताची गरज भागवण्यासाठी नागरिकांनी स्वयंस्फूर्तीनं रक्तदान करावं, असं आवाहन जनकल्याण रक्तपेढीच्या डॉक्टर तन्वी यार्दी यांनी केलं आहे....

**दिवाळीच्या बॅकग्राउंड वर रक्तदान शिबीरं काही होऊ शकलेली नाहीत, आणि रक्ताची गरज मात्र तशीच राहिलेली आहे. कॅन्सर चे रुग्ण, थलासिमिया ची मुलं ट्रान्सप्लांट्स, हृदयाच्या शस्त्रक्रिया, रस्त्यावर होणारे अपघात, गरोदर माता, नवजात बालक या सगळ्या समाज बांधवांना आपल्या रक्ताची आवश्यकता आहे. आमची आपणा सर्वांना विनंती आहे की आपण, रक्तपेढीमध्ये येऊन रक्तदान करावं आणि अशा लोकांचा जीव वाचवण्यासाठी आपला हातभार लावावा. जनकल्याण रक्तपेढीमध्ये सकाळी आठ ते संध्याकाळी आठ अशी रक्तदानाची वेळ असते. तुम्ही कोणत्याही दिवशी येऊ शकता. तसंच आपल्या सोसायटीत ऑफिस मध्ये किंवा अन्य कुठेही जिथे जमेल तिथे आपण रक्तदान शिबीर आयोजित करू शकता. एक पाऊल उचलूया, रक्तदान करूया, जीव वाचवूया.**

**निधी**

भारताच्या समृद्ध जैविक वारशाचं संरक्षण व्हावं आणि स्थानिक समुदायांना त्यांच्या योगदानाचे फायदे मिळावेत, या उद्देशानं राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणानं जैवविविधता संवर्धनासाठी 1 कोटी 36 लाख रुपयांचा निधी दिला आहे. यामध्ये सातारा जिल्ह्याच्या फलटण तालुक्यातल्या साखरवाडी आणि पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातल्या कुंजीरवाडी

या गावांना विशेष महत्त्व देण्यात आलं आहे. या गावांना प्रत्येकी 45 लाख 50 हजार रुपयांचा निधी मिळणार आहे. यामुळे जैवविविधतेच्या संवर्धनासह शाश्वत विकासाला प्रोत्साहन मिळण्यास मदत होईल.

**नावात बदल**

सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर गावाचं नाव ईश्वरपूर करायला केंद्र सरकारची मान्यता मिळाली आहे. या संदर्भात राज्य सरकारनं केंद्राला प्रस्ताव पाठवला होता. आता ईश्वरपूर नगरपरिषद, ईश्वरपूर विधानसभा मतदारसंघ यांसह सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांवर ईश्वरपूर हेच नाव वापरलं जाणार आहे.

**निधन**

आधुनिक भारतीय जाहिरात क्षेत्राचे शिल्पकार पियुष पांडे यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 70 वर्षांचे होते. गेले काही दिवस ते विषाणू संसर्गानं आजारी होते. ऑगिल्व्ही या जाहिरात कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष असलेले पांडे यांना 2016 मध्ये पद्मश्री सन्मान प्रदान करण्यात आला होता. भारतीय जनता पक्षाच्या 'अबकी बार मोदी सरकार' या जाहिरातीचे, तसंच पोलिओ लस अभियानाच्या 'दो बूंद जिंदगी के' या जाहिरातीचे ते जनक होते. कॅडबरी डेअरी मिल्क, एशियन पेंट्स, वोडाफोन अश्या अनेक सुप्रसिद्ध कंपन्यांच्या जाहिरातींच्या कल्पना त्यांनीच यशस्वी केल्या होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी पियुष पांडे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या मर्यादित षटकांच्या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना आज सिडनी इथं खेळला जाणार आहे. भारताने ही मालिका याआधीच गमावली असून संपूर्ण पराभव टाळण्यासाठी भारताला आजचा सामना जिंकावा लागणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी 9 वाजता सामना सुरू होईल.

**पाऊस**

धुळे जिल्ह्यात काल सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली. सांगली शहरासह जिल्ह्यातल्या अनेक तालुक्यातही काल जोरदार पाऊस झाला. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचलं होतं. या पावसामुळे केळी, पेरू, डाळिंब आणि द्राक्ष बागेला फटका बसला आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसात, कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची, तसंच किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**